# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

दापोली ४१२ ७१२, जि. रत्नागिरी

# संशोधन शिफारशी २०१९

## विकसित व प्रसारीत केलेले पिकांचे वाणः

### १) भात- बीएम ४ (कर्जत शताब्दी)

कर्जत शताब्दी (बीएम ४) हा मध्यम कालावधीचा, बुटका, आखुड जाड दाण्याचा अधिक उत्पादन देणारा विशेषतः पोहयांसाठी उपयुक्त भाताचा वाण कोकण विभागात लागवडीसाठी प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.





**वैशिष्ट्ये :-**

१. हा वाण बुटका आणि मध्यम कालावधीचा असन १२५ ते १३० दिवसात तयार होतो.
२. आखुड जाड दाण्याचा अधिक उत्पादन देणारा विशेषतः पोहयासाठी उपयुक्त
३. भातावरील खोडकिडा आणि जीवाणूजन्य करपा व बुरशीजन्य करपा या  रोगास साधारण प्रतिकारक्षम.
४. सरासरी उत्पन्न ३.८ ते ४ टन/हेक्टरी.
५. सुवासिक वाण

### २) भेंडी - कोकण भेंडी

भेंडीचा अधिक उत्पन्न देणारा आणि हळद्या रोगास सहनशील **कोकण भेंडी** हा वाण कोकण विभागात खरीप हंगामामध्ये लागवडीसाठी प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**वैशिष्ट्ये :-**

१. कोकण विभागात खरीप हंगामामध्ये लागवडीसाठी उपयुक्त
२. भेंडीचा अधिक उत्पन्न देणारा वाण.
३. सरासरी उत्पन्न १३५ क्विंटल/हेक्टरी
४. हळदया रोगास सहनशील
५. अति पावसामध्ये तग धरणारी.
६. आकर्षक हिरवा रंग.
७. चांगली टिकवण क्षमता (३ ते ४ दिवस).
८. कालावधी ११० ते १२० दिवस.

## पीक उत्पादन तंत्रज्ञानावर आधारीत इतर शिफारशी

### अ) नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन

### जमिनीची सुपिकता व पीक अन्नद्रव्य व्यवस्थापन

१. कोकणातील जांभ्या जमिनीत खरीप भुईमूगाच्या कोकण टपोरा या जातीपासून किफायतशीर उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळविण्यासाठी पिकाला १०० पीपीएम पॅक्लोब्युट्रॉझॉल उगवणीनंतर अनुक्रमे ३० आणि ५० दिवसांनी फवारणीद्वारे देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. कोकणातील जांभ्या जमिनीत भुईमूगाच्या कोकण भुरत्न वाणापासून किफायतशीर उत्पादन मिळविण्यासाठी पिकाची पेरणी ३०X१० सेमी अंतराने करण्याची आणि पेरणीच्या वेळी शिफारशीच्या १२५ टक्के खताची मात्रा (३१.२५ कि. ग्रॅ. नत्र आणि ६२.५ कि. ग्रॅ. स्फुरद) आणि ५ टन शेणखत प्रति हेक्टरी देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. कोकणातील जांभ्या जमिनीत रबी-उन्हाळी भुईमूगापासून आधिक उत्पादन आणि नफा मिळविण्यासाठी पेरणीवेळी प्रति हेक्टरी ५ टन शेणखत अधिक शिफारशित नत्र मात्रा आणि ५० किलो स्फुरद तसेच बिजप्रक्रिया अंतर्गत स्फुरद विरघळणारे जीवाणू (डिजीआरसी २) २५ ग्रॅम प्रति किलो बियाणे शिफारस करण्यात येते.

४. उत्तर कोकण किनारपट्टीच्या खाऱ्या जमिनीमध्ये पालक या पिकापासून अधिक उत्पादन व आर्थिक नफा मिळविण्यासाठी पुसा हरित या वाणाची लागवड करुन वाणस प्रति हेक्टरी ७५ कि. ग्रॅ. नत्र आणि ५० कि. ग्रॅ. स्फूरद खतांची मात्रा देण्याची शिफारस करण्यात येत आहे.
५. कोकण विभागात शेवरकंदापासून अधिक उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळण्यासाठी शिफारशीत खत मात्रेसह (शेणखत १० टन + १००:५०:१०० किलो नत्र, स्फुरद, पालाश प्रती हेक्टर) २० किलो मॅग्नेशिअम सल्फेट, १२.५ किलोझिंक सल्फेट, १० किलो बोरक्स जमिनीतून व ०.५ टक्के फेरस सल्फेट फवारणीव्दारे देण्याची शिफारस करण्यात येते.

## ब) उद्यानविद्या

१. जांभ्या कातळाच्या सपाट भागांमध्ये (सडयावर) हापूस आंब्याचे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी कॅल्शीयम नायट्रेट (१ टक्के) द्रावणाच्या तीन फवारण्या फळे वाटाण्याच्या, गोटीच्या आणि अंडयाच्या आकाराची असताना करण्याची शिफारस करण्यात येत आहे.
२. काकडी या पिकाच्या अधिक दर्जेदार उत्पादना आणि आर्थिक फायद्यासाठी वेलीला त्रिकोणी पध्दतीने उभारलेल्या बांबूवर प्लॅस्टीक सुतळीचा आधार देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## क) पशु व मत्स्य विज्ञान

### पशुविज्ञान

१. कोकण कन्याळ जातीच्या करडांच्या दुधाची गरज भागविण्यासाठी एकूण दुधाच्या गरजेपैकी ५० टक्के सोयाबीनचे दुध पाजण्याची शिफारस करण्यात येते.

### मत्स्य विज्ञान

१. गोल्ड फिश माशाचे शेततळयातील पिंजऱ्यामध्ये संवर्धन करताना किमान २० मिमी आकाराचे १५० नग प्रति घन मीटर क्षमतेने साठवणूक करून त्यांच्या वजनाच्या ८ % दराने ३२ % प्रथिनेयुक्त खाद्य द्यावे, अशी शिफारस करण्यात येत आहे.
२. बायोफ्लॉक पध्दतीव्दारे गव्हाचे पीठ हे कार्बन स्त्रोत वापरुन कार्बन/नत्राचे गुणोत्तर १९ ठेवून ९० दिवसांमध्ये रोहू माशाची इष्टतम वाढ आणि जगण्याचे प्रमाण मिळविणेसाठी १५ बीज/१०० लिटर (लांबी २० ते २५ मिमी) या घनतेने साठवणूक करण्याची शिफारस करण्यात येत आहे.
३. ताऊज (सिर्गनस व्हर्मिकुलाटस) माशांच्या शाश्वत मासेमारीसाठी ३१७ मी. मी. (एकूण लांबी) पेक्षा लहानमासे पकडण्यात येवू नयेत अशी शिफारस करण्यात येत आहे.
४. टॅजेरिन (झिफ्योफोरस हेलेरी) जातीच्या शोभिवंत माशांच्या नवजात मत्स्य पिल्लांची योग्य वाढ व जगवण्याचे प्रमाण अधिक मिळविण्यासाठी पहीले दोन आठवडे आर्टिमिया नॉप्लीया तसेच त्या पुढील दोन आठवडे कोळंबी खाद्य (४१ टक्के प्रथिने) भुकटी स्वरुपात दिवसातुन तीन वेळा चार तासांच्या अंतराने देण्याची शिफासर करण्यात येत आहे.

५. सनसेट प्लॅटी (झिफ्योफोरस मॅक्युलॅटस) या जातीच्या शोभिवंत माशांची १२० दिवसात योग्य वाढ व जगवण्याचे अधिक प्रमाणासाठी ३० दिवस वयाची पिल्ले १ नग प्रति २.५ लिटर पाण्यात संचयन करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## ड) काढणीपश्चात व्यवस्थापन

१. पालेभाज्यापासून माठ ६ टक्के, पालक २८ टक्के व अरारुट स्टार्च ४३ टक्के व इतर मसाले २३ टक्के वापरुन तयार केलेले झटपट सुप मिश्रण तयार करण्याच्या प्रक्रियेची शिफारस करण्यात येते. झटपट सुप मिश्रण ॲल्युमिनिअम लॅमिनेटेड पिशवीत ९० दिवसांपर्यत चांगल्या स्थितीत राहते. (इतर मसाले – जिरे पूड ०.६६ टक्के, इलायची पूड ०.६६ टक्के, काळी मिरी पूड १.०६ टक्के, मिरची पूड ५ टक्के, मिठ ७.३३टक्के, कांदा पूड २ टक्के, लसून पूड १.३३ टक्के, सायट्रिक आम्ल ०.३३ टक्के वगाजराचे काप ४.६६ टक्के मिश्रीत करावे.)

२. बोकडाच्या मांसातील स्नायु मऊ करणे अणि सहा दिवसा पर्यंत संरक्षित करण्यासाठी विडयाच्या पानांचा काढा १:१ याप्रमाणात ३० मिनिटे प्रक्रिया करुन १०-१५ अंश सेल्सीअस तापमानाला ठेवण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. गाजराचा गर व साखर यांचे १.१ प्रमाण तसेच वापरण्यात येणाऱ्या साखरेच्या ६७.५ टक्के पावडर, ५ टक्के कॉर्न फ्लोअर आणि ५ टक्के वनस्पती तूप वापरुन १५ दिवस साठवण क्षमता असलेला गाजर पेढा तयार करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. सिताफळ व रताळी यांचा ८०:२० प्रमाणात ४८ टक्के गर, ४८ टक्के साखर, २ टक्के मिल्क पावडर, १ टक्का कॉर्न फ्लोअर आणि १ टक्का वनस्पती तूप वापरुन सिताफळ - रताळी ३० दिवस साठवण क्षमता असलेली मिश्र बर्फी तयार करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५. चार टक्के बोरीक ॲसिड द्रावणाची मात्रा देऊन २०० गेज पॉलिइथिलिन पिशवीमध्ये बंद करुन अरेबियन जास्मिन (मोगरा) कळया १३ ±१ अंशसेल्सीअस तापमानाला ७२ तास साठवण करण्याची शिफारस करता येते.

६. सर्वोत्तम स्विकार्हहता असलेली आणि वातावरणीय तापमानाला ८ दिवसांची आणि रेफ्रिजरेशन तापमानाला २४ दिवसांची टिकवण क्षमता असलेली खरवसवडी तयार करण्यासाठी गाईच्या दुधाचा चिक व साधे दुध यांचा ३:१ या प्रमाणात वापर करण्याची आणि खरवस वडी मिश्रणाच्या २० टक्के हापूस आंब्याच्या रसाचा स्वाद घटक म्हणून वापरण्याची शिफारस करण्यात येते.

## इ) पीक संरक्षण

१. काळी मिरीवरील हळुवार मररोगाचे प्रभावी  नियंत्रण व फायदेशिर उत्पादनाकरीता, पोचोनिया क्लॅमिडोस्पोरिया २ किग्रॅ/वेल (१.०५ किग्रॅ/ ५० किग्रॅ शेणखत), तदनंतर सुडोमोनास फ्ल्युरोसेन्स २ % (३ लिटर/वेल) याची मात्रा दोनवेळा, मे-जून आणि ऑगस्ट-सप्टेंबर मध्ये जमिनीत वेलीच्या मुळाभोवती देण्याची शिफारस करण्यात येते.

२. भुईमुगाला प्रादुर्भाव करण्याऱ्या स्क्लेरोशिअम रॉल्फसाय (खोड कुजव्या) आणि ॲस्परजिलस नायजर (खोड कुजव्या) या रोगांचा प्रादुर्भाव कमी करुन अधिक उत्पादन मिळण्यासाठी स्यूडोमोनास फ्ल्यूरोसन्स प्रजाती २ या जीवाणूयुक्त बुरशीनाशकाची प्रती किलो बियाणास २५ ग्रॅम या प्रमाणात बीज प्रक्रिया करण्याची शिफारस करण्यात येते.

## फ) कृषि अभियांत्रिकी

१. कोकण विभागामध्ये जांभ्या जमिनीमध्ये फुलकोबी पिकाच्या अधिक फायदयासाठी इनलाईन ठिबक सिंचनाव्दारे (४ लिटर प्रति तास, ५० सें. मी. अंतर) पीक बाष्पपर्णोर्त्सजनाच्या ८० टक्के पाणी व चंदेरी रंगाच्या आच्छादनासह देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली विकसित उभ्या व त्रिकोणी आकाराच्या हायड्रोपोनीक सांगाडयात व्हर्म्युक्युलेट (५०%) + कोकोपीट (२५%) + व्हर्मीकंपोस्ट (२५%) माध्यमाचा वापर करुन कोकण विभागात घरगुती भाजीपाला (मेथी, कोथंबीर व पालक) पिकविण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

## ग) सामाजिक शास्त्रे

### कृषि अर्थशास्त्र

आजारी काजू उदयोगांना राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायधिकरण (NCLT) आधारावर राज्य धोरणासह पुर्नजिवीत करणे तसेच कोकण काजू ब्रॅण्ड विकास करण्यासाठी नियंत्रित बाजारात जागा उपउब्ध करून कच्चा काजू व काजूगंराच्या किंमती स्थिर करणे आणि आयात होणाऱ्या काजूवर नियंत्रण ठेवण्यासाठी आयातकर वाढविण्यासाठी राष्ट्रीय धोरण ठरविण्याची, शिफारस करण्यात येते.

### विस्तार शिक्षण

१. विस्तार यंत्रणांनी मृद चाचणी सुविधा, त्याची गरज आणि महत्व या संबंधीचा जागरुकता कार्यक्रम राबवावे व जमिनीच्या आरोग्य पत्रिकेनुसार एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन वापराविषयीची प्रात्यक्षिके मोठया प्रमाणावर घेण्यात यावीत, अशी शिफारस करण्यात येत आहे.

२. डॉ. बाळासाहेब कोकण कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या हापूस आंबा, कृषि अभियांत्रिकी, भात काढणी पश्चात तंत्रज्ञान, काजू पिक संरक्षण आणि वनश्री या मोबाईल ॲप्सची उपयुक्तता पाहता, कृषि विभागाव्दारे या ॲप्सचा प्रचार व प्रसार करावा, अशी शिफारस करण्यात येत आहे.

****